# आम्हाला
# मदत करा
# आपली योग्य
# माहिती मिळवण्यासाठी

HSBC
The world's local bank

# आपलं ग्राहक
# आणि
# अँटी मनी लाँडरिंग जाणून घ्या

## ग्राहक जागरुकता

### मनी लाँडरिंग आणि टेररिस्ट फायनान्सिंग म्हणजे काय ?

मनी लाँडरिंग म्हणजे छुपा अर्थपुरवठा जो बेकायदेशीर व्यवहार असल्याचं उघड होत नाही. मनी लाँडरिंगद्वारे लाँडरर गुन्हेगारी कृत्याचा उपयोग करून जमा केलेली संपत्ती कायदेशीर फंडात रुपांतरीत करतो.

दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्यांना, कट आखणाऱ्यांना किंवा त्यात सामिल असलेल्यांना कोणत्याही स्वरूपात आर्थिक सहाय्य देऊन दहशतवादाला अर्थपुरवठा केला जातो. दहशतवादाचा स्रोत कायदेशीर असू किंवा नसू शकतो. तरीही या दहशतवाद आणि मनी लाँडरिंग यांचा संबंध येतो. कारण त्यातून दहशतवाद्यांना अर्थपुरवठा करणं सोपं जातं.

### मनी लाँडरिंग गुन्हा कसा असतो ?

मनी लाँडरिंग प्रतिबंध कायदा 2002 अंतर्गत जी व्यक्ती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी होण्याचा प्रयत्न करते किंवा जाणूनबुजून सहाय्य करते अथवा जाणतेपणी एक पक्ष बनून अथवा कोणत्याही कामाचा भाग बनते किंवा गुन्हेगारीशी संबंधित होते आणि अनटेन्टेड मालमत्ता म्हणून दाखवते त्याला किंवा तिला मनी लाँडरिंग गुन्हेगार मानले जाते.

### केवायसी म्हणजे काय ?

केवायसी म्हणजे नो युवर क्लायंट/कस्टमर–म्हणजेच ग्राहकाची ओळख पटवण्यासाठी वापरली जाणारी संज्ञा. केवायसीमुळे बँकेला ग्राहकांची आणि त्यांच्या आर्थिक व्यवहारांची ओळख करून घेता येते, त्यातील जोखीमीचे व्यवस्थापन करता येतं आणि ग्राहकाला जास्त चांगली सेवा देता येते.

### केवायसी सक्तीची आहे ?

होय. ही नियामक आणि कायदेशीर आवश्यकता आहे. नो युवर कस्टमर स्टँडर्ड्स–अँटी मनी लाँडरिंग (एएमएल) कसोट्यांबाबत 29 नोव्हेंबर 2004 रोजी रिजर्व बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या मार्गदर्शिकेनुसार बँकेने केवायसी स्टँडर्ड्स आणि एएमएल पूर्तता करण्यासाठी सर्वसमावेशक पॉलिसी फ्रेमवर्कचा अवलंब करायला हवा. 1 जुलै 2005 रोजी लागू झालेल्या पीएमएलए नुसार बँक्स, आर्थिक संस्था आणि इंटरमेडियरींनी कायद्यातील केवायसी आणि एएमएलच्या किमान कसोट्या आणि त्या अंतर्गत असलेले नियम याचं पालन केलं जात असल्याची खात्री करावी.

## क्लायंट्सच्या ओळखीची तपासणी बँकेने कधी करावी ?

पीएमएलए नुसार बँकेने ओळखीसाठी दिलेले पुरावे आणि सध्याचा पत्ता किंवा कायमस्वरूपी पत्ता किंवा क्लायंटचा पत्ता, त्याच्या कामाचे स्वरुप आणि खातं उघडताना किंवा कोणताही व्यवहार करताना त्याची आर्थिक स्थिती याची तपासणी करावी.

## मी बँकेला ओळखीचा पुरावा म्हणून काय द्यावं ?

सरकारी अधिकाऱ्यांनी जारी केलेले फोटो, पत्ता आणि सही असलेली कागदपत्रे सर्वात उत्तम ओळखीचे पुरावे आहेत. कोणत्याही व्यक्तीला पासपोर्ट, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, सरकारी ओळखपत्र, डिफेन्स आयडी कार्ड, फोटो पॅन कार्ड, फोटो रेशन कार्ड सादर करून ओळखीचा पुरावा देता येईल.

नॉन इनडिविज्युअल अकाउंट्ससाठी दिलेल्या कागदपत्रांसोबत वैयक्तीक सही आणि खालील कागदपत्रे द्यावीत:

सोल प्रोप्रायटरी फर्म, पार्टनरशिप फर्म, लिमिटेड आणि प्रायव्हेट लिमिटेड कंपनी, सोसायटी, ट्रस्ट, हिंदु अविभक्त कुटुंब–विक्री/सेवा कर/ एक्ससाइज नोंद, दुकाने आणि संस्था कायद्यांतर्गत नोंदणीकरण, फर्मचं पॅन आयडी/ प्राप्ती कर रिटर्न.

फर्मच्या नावे पाणी/ वीज/ नगरपालिका कर बिल, पार्टनरशिप फर्मचं पार्टनरशिप करारपत्र, लिमिटेड आणि प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांनी असोसिएशनचं मेमोरँडम आणि आर्टिकल्स, इनकॉर्पोरेशनचं प्रमाणपत्र, बोर्डचा ठराव, शेअरहोल्डिंग पॅटर्न स्थापन करण्यासाठी रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे भरलेलं वार्षिक रिटर्न, रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे भरलेल्या फॉर्म 32 ची प्रमाणित प्रत, शेअर होल्डिंग पॅटर्न ओळखण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर भरलेलं वार्षिक रिटर्न.

सोसायटीसाठी–को–ऑपरेटिव सोसायटीजच्या रजिस्ट्रारकडील सोसायटी रजिस्ट्रेशनची प्रमाणित प्रत किंवा उपरजिस्ट्रार ऑफ अश्युरन्सेस सोसायटीचा प्रकार, बाय लॉज/ मेमोरँडम ऑफ असोसिएशन/ कन्स्ट्यीट्यूशन जसं प्रकरण असेल तसं, मॅनेजिंग कमेटी/ बोर्ड/ ऑफिस बेअरर्स यांनी मंजूर केलेला ठराव, अकाउंटला ओपनिंग आणि साइनिंग सूचना देताना मेमोरँडम ऑफ असोसिएशन/ बाय लॉज यातील यादीनुसार, पॅन कार्ड/ पॅन ॲलोटमेंट लेटर.

ट्रस्ट करार, चारिटी कमिशनरने जारी केलेल्या रजिस्ट्रेशनच्या प्रमाणपत्राची फोटोकॉपी, आयटी रिटर्न आणि ट्रस्टने चारिटी कमिशनरकडे भरलेले रिटर्न्स, अकाउंट उघडण्यासाठी ट्रस्टीजकडून मंजूर झालेले ठराव.

एचयूएफ खात्यासाठी– एचयूएफचं पॅन आयडी

*कृपया वरील माहिती म्हणजे यादी किंवा तपशील नव्हे तर फक्त एक झलक आहे. अधिक माहितीसाठी कृपया आम्हाला आमच्या ब्रँचवर संपर्क करा, आमच्या फोन बँकिंग नंबर्सवर संपर्क करा अथवा येथे लिहा: info@hsbc.co.in*

### केवायसी हेतूसाठी ब्रँचमध्ये मी कोणाला संपर्क करू ?

आपण बँकेत आपल्या रिलेशनशिप मॅनेजरला संपर्क करा किंवा ज्या कार्यालयाने आपलं खातं उघडलं आणि व्यवहार करताना ज्यांच्याशी नेहमी संपर्क येतो त्यांना संपर्क करा.

### केवायसी माहिती घेऊन बँक काय करते ?

खातं उघडताना/ चालू तत्वावर बँकेने प्राप्त केलेली ग्राहकाची माहिती गोपनीय ठेवली जाते आणि लागू कायदा व नियम याअंतर्गत आवश्यक असेल त्याच्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला दाखवली जात नाही.

### मी बँकेला जर आवश्यक केवायसी माहिती/ कागदपत्रे दिली नाही तर काय होईल ?

बँक आपलं खात उघडण्यास नकार देईल(जर तुम्ही संभाव्य ग्राहक असाल तर) किंवा केवायसी माहिती/ कागदपत्रे न दिल्यामुळे आपल्याशी नातं तोडू शकते (जर तुम्ही सध्याचे ग्राहक असाल तर). मात्र, आवश्यक कागदपत्रे देऊ न शकणाऱ्या ग्राहकांच्या विशिष्ट प्रकारासाठी वाइड आरबीआय डीबीओडी सर्क्युलर नं. AML. BC. 28/ 14.01.001/ 2005-06 दिनांक 23 ऑगस्ट 2005 नुसार बँक खातं उघडेल.

HSBC
The world's local bank

*Issued by The Hongkong and Shanghai Banking Corporation Limited, India. Incorporated in Hongkong SAR with limited liability*